## जाहीर सूचना (नोटीस)

रत्नागिरी जिल्हयातील राष्ट्रीय भूमि अभिलेख कार्यक्रमांतर्गत कामकाज करणा-या कर्मचा-यांसाठी नवीन डिजिटल सिग्नेचर पुरविणे अथवा मुदत संपलेल्या डिजिटल सिग्नेचरचे नुतनीकरण करणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने डिजिटल सिग्नेचर पुरवठा करणाऱ्यांना सूचित करण्यात येत आहे की, या कार्यालयाला आवश्यक असणाऱ्या

3. **नवीन डिजिटल सिग्नेचर ( Digital Signature with Token) - संख्या अंदाजे 118**
4. **मुदत संपलेल्या डिजिटल सिग्नेचरचे नुतनीकरण ( Digital Signature without token) - संख्या अंदाजे 194**

साठी दर पत्रके मागविण्यात येत आहेत.

सदरचे डिजिटल सिग्नेचरचा पुरवठा करण्यास तसेच मुदत पूर्ण झालेल्या डिजिटल सिग्नेचर नुतनीकरण करण्यास इच्छुक असणा-यांनी दिनांक 04.08.2020 ते दिनांक 10.08.2020 पर्यंत डिजिटल सिग्नेचरचे दर पत्रक नायब तहसीलदार, कुळवहिवाट शाखा, जुनी प्रशासकीय इमारत, जिल्हाधिकारी कार्यालय रत्नागिरी येथे समक्ष सकाळी 10.00 ते सायंकाळी 5.00 या कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी व वेळी लेखी बंद लखोटयात सादर करावे. मुदती नंतर आलेल्या दर पत्रकांचा विचार केला जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी. पुरवठा करावयाच्या साहित्याबाबत अधिक माहितीसाठी तसेच अटी व शर्तीबाबत संगणक कक्ष, दुसरा मजला, जुनी प्रशासकीय इमारत, जिल्हाधिकारी कार्यालय येथे संपर्क साधावा.

प्राप्त झालेली पुरवठादार यांची दरपत्रके दिनांक 11.08.2020 रोजी सकाळी 11.00 वाजता निवासी उपजिल्हाधिकारी, रत्नागिरी यांचे दालनात उघडण्यात येतील याची नोंद घ्यावी.

( दत्ता भडकवाड )
निवासी उपजिल्हाधिकारी
तथा डी.डी.ई. रत्नागिरी

क्रमांक. संगणक/ई-म्युटेशन/दरपत्रक/07/2020
जिल्हाधिकारी कार्यालय, रत्नागिरी
दिनांक - 31.07.2020

प्रतिलिपी :-

1. जिल्हाधिकारी कार्यालय,रत्नागिरी यांचे सूचना फलकावर प्रसिध्दीसाठी
2. जिल्हा सूचना व विज्ञान अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय रत्नागिरी यांजकडे

   2/- सदरची जाहीर सूचना(नोटीस) जिल्हाधिकारी कार्यालयाच्या अधिकृत संकेतस्थळांवर प्रसिध्द करणेत यावी.

3. उपविभागिय अधिकारी रत्नागिरी/ तहसिलदार रत्नागिरी यांचे प्रसिध्दीफलकावर प्रसिध्दीसाठी.

D:\NLRMP DATA FROM 20.06.2017\tender\DSC\DSC tender for year 2020-21.docx 81

Scanned by CamScanner

जिल्हाधिकारी अधिकारी, रत्नागिरी यांचे कार्यालय.
पत्ता :- संगणक कक्ष, दुसरा मजला, जुनी प्रशासकीय इमारत, जिल्हाधिकारी कार्यालय रत्नागिरी
दुरध्वनी क्रमांक :- 02352-222139, ई मे आयडी:- tncrat@gmail.com

---

राष्ट्रीय भूमि अभिलेख कार्यक्रमांतर्गत नव्याने कामकाज करणा-या कर्मचा-यांसाठी नवीन डिजिटल सिग्नेचर **(Digital Signature with Token)** पुरविणे तसेच मुदत पूर्ण झालेल्या डिजिटल सिग्नेचर नुतनीकरण करणे **(Digital Signature without Token)** आवश्यक आहे. त्यासाठी खालील अटी व शर्तींच्या अधिन राहून मान्यताप्राप्त पुरवठादारांकडून दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

**अटी व शर्ती:-**

1 दरपत्रक दाखल करतेवेळी दरपत्रकासोबत डीएससी नवीन खरेदी तसेच मुदत संपलेल्या डिजिटल सिग्नेचरचे नुतनीकरण यासाठी खर्चाची अपेक्षित अंदाजे रक्कम 1,64,000/- च्या अनुषंगाने 3 टक्के अनामत रक्कम रू. 4,920/- (अक्षरी रू. चार हजार नऊशे वीस मात्र) स्टेट बँक ऑफ इंडिया, रत्नागिरी येथील बँकेचा, तहसीलदार सर्वसाधारण जिल्हाधिकारी कार्यालय रत्नागिरी, यांचे नांवे धनाकर्षाव्दारे (Demand Draft) जोडलेली असावी. अनामत रक्कम भरलेली नसल्यास दरपत्रक विचारात घेतले जाणार नाही.

2 जिल्हा कार्यालयातील वरिष्ठ अधिका-यांच्या सूचनेनूसार आणि त्यांचे मार्गदर्शनाप्रमाणे रत्नागिरी जिल्हयातील जिल्हा मुख्यालयी तसेच तालुका मुख्यालयी ठिकाणी व कोणत्याही वेळी मागणीनुसार नवीन डिजिटल सिग्नेचरचा पुरवठा करणे पूरवठादार यांचेवर बंधनकारक आहे.

3 केंद्र शासनाच्या वस्तू व सेवा कर अधिनियम 2017 मधील तरतुदीनुसार दरपत्रक सादर करताना त्यामध्ये GST स्वतंत्र नमुद करुन दर पत्रक सादर करावे.

4 शा.नि. वित्त विभाग,मंत्रालय,मुंबई दि. 22.04.2008 मधील तरतुदीनुसार देयकाची मूळ रक्कम (GST वगळून) विचारात घेवून त्यावर शासन निर्णयात नमूद केलेल्या दराप्रमाणे TDS ची रक्कम कपात करून घेणेत येईल.

5 पुरवठादार यांचे खरेदी प्राधिकारी यांचेशी हितसंबधाचा संघर्ष नसल्याबाबत आणि इच्छुक संस्थेने एकल निविदा देणेबाबत पुरवठादार यांनी लेखी हमी देणे आवश्यक आहे.

6 पुरवठा दाराने सर्व साहित्य पोहोच करणेचे आहे त्यासाठी इतर कोणताही खर्च किंवा आकार देय होणार नाही.

7 पुरवठादारास कोणत्याही प्रकारचे अग्रिम (ॲडव्हान्स) दिला जाणार नाही.

8 सर्व सामग्री / साहित्य उत्तम प्रतीचे /दर्जाचे असणे बंधनकारक राहिल.

9 काम पूर्ण झाल्यानंतर सर्व देयके तीन प्रतीत सादर करणेत यावीत. देयक प्राप्त झालेनंतर अनुदान उपलब्धतेनुसार देयेके अदा करणेची कार्यवाही करणेत येईल.

10 वरील कोणत्याही अटीचा भंग झाल्यास आणि डिजिटल सिग्नेचरचा पूरवठा वेळेवर न झाल्यास अनामत रक्कम रू. 4,920/- (अक्षरी रू. चार हजार नऊशे वीस मात्र) जप्त करुन सरकारजमा करणेत येईल.

11 मंजूर दरपत्रकाचा वैधता कालावधी मंजूरी दिनांकापासून ते दिनांक 31.03.2021 पर्यंत राहिल.

12 दरपत्रक मंजूर झालेल्या पुरवठादाराने जिल्हाधिकारी रत्नागिरी यांनी ठरवून दिलेल्या विहीत नमुन्यात रु.200/- (अक्षरी रु. दोनशे मात्र) इतक्या रकमेच्या स्टॅम्प पेपरवर करारनामा लिहून देणे बंधनकारक राहील.



Scanned by CamScanner

13 कोणत्याही अटीच्या अर्थाबद्दल किंवा इतर कोणत्याही बाबतीत विवाद उद्भवल्यास जिल्हाधिकारी रत्नागिरी यांचा निर्णय अंतीम व बंधनकारक राहील.

14 सदरची दरपत्रक सूचना व त्यातील कोणताही भाग कोणतीही पूर्व सूचना न देता रदद् करणेचा /राखून ठेवणेचा तसेच सुधारणा करणेचा हक्क जिल्हाधिकारी रत्नागिरी यांनी राखून ठेवला आहे.

15 दरपत्रकातील नमुद साहित्याचा पुरवठा शासनाकडून झाल्यास सदर साहित्य पुरवठादाराकडून मिळवून घेणे जिल्हाधिकारी यांचेवर बंधनकारक राहणार नाही.

16 दरपत्रक मंजूर केल्याच्या दिनांकापासून ते दिनांक 31.03.2021 पर्यंतच्या कालावधीमध्ये आवश्यकतेनुसार संबंधीत साहित्याचा पुरवठा करणे पुरवठादारावर बंधनकारक आहे.

साहित्याच्या तपशिलाबाबत / दर्जाबाबत शंका निर्माण झाल्यास किंवा अधिक माहितीची आवश्यकता असल्यास नायब तहसिलदार, कुळवहिवाट शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय रत्नागिरी यांचेशी तात्काळ संपर्क साधावा.

(दत्ता भडकवाड)
निवासी उपजिल्हाधिकारी
तथा डी.डी.ई. रत्नागिरी



Scanned by CamScanner